Regional Marathi Text Bulletin, Chatrapati Sambhajinagar

Date: 09 March 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०९ मार्च २०२४ दुपारी १.०० वा.**

****

देशात तीन कोटी महिलांना लखपती दिदी बनवणं हे लक्ष असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. अरुणाचल प्रदेशच्या इटानगर इथं पंतप्रधानांनी इशान्येकडील राज्यांमधल्या ५५ हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास कामांच लोकार्पण केलं. त्यावेळी ते बोलत होते. इशान्येकडील राज्यात उद्योगधंद्यांनाही चालना दिली जाणार असून रोजगाराच्या नव्या संधी निर्माण केल्या जातील, असंही पंतप्रधान यावेळी म्हणाले.

****

गोवर आणि रुबेला निर्मूलनासाठी भारतीय आरोग्य मंत्रालयानं केलेल्या कार्याचा अमेरिकन रेड क्रॉस संस्थेनं पुरस्कार देऊन गौरव केला आहे. भारतीय राजदूत श्रीप्रिया रंगनाथन यांनी वाशिंग्टन इथं हा पुरस्कार स्वीकारला, अशी माहिती आरोग्य मंत्रालयानं निवेदनाद्वारे दिली आहे.

या कार्यामुळं ५० जिल्ह्यांमध्ये सातत्यानं गोवरचा एकही रुग्ण तर २२६ जिल्ह्यांमध्ये गेल्या १२ महिन्यांत रुबेलाचा एकही रुग्ण आढळलेला नाही, अशी माहिती या निवेदनात देण्यात आली आहे.

****

राज्याच्या चौथ्या महिला धोरणामुळं महिलांना सर्व क्षेत्रांत समान संधी उपलब्ध होणार असून संरक्षण तसंच आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळणार आहेत. या धोरणामुळं अधिकृत कागदपत्रांवर आईचं नाव लावणं बंधनकारक होणार आहे. निमशासकीय तसंच खाजगी कंपन्यांनीही मातृत्व आणि पितृत्व रजा द्यावी, असा प्रस्ताव या धोरणात नमूद करण्यात आला आहे. दरम्यान, देशातल्या पन्नास टक्के महिलांना मानव संसाधन क्षेत्रात प्रशिक्षित करण्याच्या दिशेनं केंद्र आणि राज्य

सरकार महिला विकासाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

****

केंद्रीय उर्जा मंत्रालयाअंतर्गत राज्यात नाशिक, सोलापूर, अहमदनगर आणि पुणे इथं १ हजार ३५२ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या विकासासाठी हिमाचल प्रदेशच्या एस जे व्ही एन लिमिटेड या सार्वजनिक क्षेत्रातील संस्थेची निवड झाली आहे, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा आणि व्यवस्थापकीय संचालक गीता कपूर यांनी दिली. यासाठी ७ हजार ४३६ कोटी रूपये इतकी गुंतवणूक करण्यात येणार आहे.

****

'मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियाना'चा पुढचा टप्पा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल कोल्हापूर जिल्ह्यात हातकणंगले इथं पार पडला. हे अभियान म्हणजे दोन कोटी महिलांच्या आयुष्यामध्ये बदल घडवणारी क्रांतिकारी योजना असून महिला आर्थिक विकास महामंडळानं राज्यात एक लाख पासष्ट हजार महिला बचत गट निर्माण केले असून त्यात वीस लाख महिला सभासद असल्याचं मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी नमूद केलं.

****

हिंगोली ते मुंबई जनशताब्दी एक्स्प्रेसला आज रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे हिंगोली रेल्वेस्थानकावर हिरवा झेंडा दाखवणार आहेत .आजच्या शुभारंभानंतर उद्या १० मार्चपासून ही एक्स्प्रेस हिंगोली इथून पहाटे चार वाजून २० मिनिटांनी सुटणार आहे. जालन्याला ही गाडी सकाळी नऊ वाजता, छत्रपती संभाजीनगरला नऊ वाजून ५० मिनिटांनी तर मुंबईला दुपारी चार वाजून ५० मिनिटांनी पोहोचेल. मुंबईहून ही गाडी दुपारी बारा वाजून दहा मिनिटांनी सुटणार असून, छत्रपती संभाजीनगरला संध्याकाळी सहा वाजून २५ मिनिटांनी, जालना इथं संध्याकाळी सात वाजून ४५ मिनिटांनी, तर हिंगोली इथं रात्री साडे बारा वाजता पोहोचेल.

****

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरच्या प्रादेशिक वृत्तविभागात, कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्त करण्यासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. शैक्षणिक पात्रता, अनुभव, वय या अर्हतेसाठी इच्छुकांनी newsonair.gov.in/vacancies या संकेतस्थळाला भेट द्यावी. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज येत्या १२ मार्चपर्यंत सी एस एन आर एन यू डॉट ए डी एम एन ॲट जीमेल डॉट कॉम या ईमेलवर, किंवा, कार्यालय प्रमुख, प्रादेशिक वृत्त विभाग- आकाशवाणी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर, या पत्यावर पाठवावेत.

****

भारत आणि इंग्लंड यांच्यात धरमशाला इथं सुरू असलेल्या पाचव्या आणि अंतिम कसोटी क्रिकेट सामन्यात आज तिसऱ्या दिवशी भारताचा डाव ४७७ धावांवर आटोपला. पहिल्या डावात भारतानं आतापर्यंत २५९ धावांची आघाडी घेतली आहे. इंग्लंडनं आपल्या दुसऱ्या डावात ७ गडी गमावत १४१ धावा केल्या आहेत.

****

पॅरिस इथं सुरू असलेल्या फ्रेंच ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेननं पुरुष एकेरीत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. काल रात्री झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत त्यानं सिंगापूरच्या खेळाडूचा पराभव केला. पुरुष दुहेरीत सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीनंही उपांत्य फेरी गाठली आहे. आज त्यांचा सामना दक्षिण कोरियाच्या जोडीशी होणार आहे.

****